# मुलींच्या शिक्षणाला जगभर प्राधान्य

## शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिक्षणाच्या पलीकडे सर्वच क्षेत्रात महिलांना प्राधान्य आहे. आधुनिक शिक्षण पद्धतीमध्ये जगभर महिला शिक्षणाला प्राधान्य दिले जात आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले.

ताराराणी विद्यापीठाच्या माजी उपाध्यक्षा सरोजनिदेवी पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. 'चालू शतकातील महिलांचे शिक्षण' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष



**कोल्हापूर : ताराराणी विद्यापीठाच्या माजी उपाध्यक्षा सरोजनिदेवी पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. बी. एम. हिर्डेकर. समवेत डॉ. क्रांतिकुमार पाटील.**

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी गरीब व गरजू विद्यार्थीनींना गणवेश वाटप करण्यात आले.

हिर्डेकर म्हणाले, आधुनिक युगात महिलांची शैक्षणिक क्षीतीजे विस्तारली आहेत. सकाळी उठल्यापासून ते झोपेपर्यंत आपले काम करीत असते, त्यामुळे त्यांचा सन्मान केला पाहिजे. सध्या घर संसार सांभाळून महिला प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहेत. एका महिलेने शिक्षण घेतल्यास संपूर्ण कुटुंबाची समृद्धता वाढते. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाकडे समाजातील प्रत्येक घटकाने विशेष लक्ष दिले पाहिजे. सरोजनीदेवी यांचे या विद्यापीठाच्या स्थापनेत मोठे योगदान आहे असेही ते म्हणाले.

उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुजय पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुत्रसंचालन पौर्णिमा मंडलिक यांनी केले. आभार एस. डी. चव्हाण यांनी मानले. यावेळी शिक्षक, प्राध्यापक, आजी–माजी विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned by CamScanner